रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएसटी/वशी - बगीचा/3857/२०२२

दिनांक - 30 DEC 2022

प्रती,

....................................

....................................

....................................

**विषय - संस्थान मालकीच्या विविध जमिनींमध्ये जे.सी.बी. च्या सहाय्याने कामे करुन घेणेकामी वार्षिक दरपत्रके देणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे बगीचा विभागास संस्थान मालकीचे विविध परिसरातील जमिनी लागवडीखाली आणणेकामी सदर जमिनीतील काटेरी झुडपे काढणे, लेव्हल करणे, नाली घेणे इ. कामे जे.सी.बी.च्या सहाय्याने आवश्यकतेनुसार करावयाची आहे. तरी याकामी खालील अटी - शर्तीस अधीन राहून जे.सी.बी चे प्रती तास प्रमाणे वार्षिक दर देण्याचे करावे.

**अटी व शर्ती**

०१. जे.सी.बी. चे दर वार्षिक (०१ वर्ष कालावधीकरिता) व प्रती तासाप्रमाणे असावेत.

०२. सदरचे दर इंधन ,जे.सी.बी मशिन व इतर साधने तसेच चालकासह असतील. संस्थानचे मागणीनुसार सदर कामे वेळेत पूर्ण करुन देणेची जबाबदारी आपणावर राहील.

०३. इंधनाचे दर वाढले तरी आपणास वाढीव रक्कम अदा केली जाणार नाही.

०४. आपणास कोणत्याही प्रकारचा ॲडव्हान्स दिला जाणार नाही.

०५. सदर काम इकडील विभागाकडील मुकादम / सुपरवायझर यांचे अधिपत्याखाली करावे लागेल.

०६. आपले दरपत्रक बंद पाकीटात दिनांक 10/01/2023 रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नावाने "जे.सी.बी.चे वार्षिक दरपत्रक" असा पाकीटावर स्पष्ट उल्लेख करून संस्थानचे आवक विभागाकडे जमा करावे.

०७. काम करत असतांना काही अपघात अथवा नुकसान झाल्यास, तक्रार उद्भवल्यास ती संपूर्ण जबाबदारी आपणावर राहील.

०८. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे कुठलेही एक अथवा सर्व कोटेशन कुठल्याही कारणाशिवाय नाकारणे अथवा स्विकारणेबाबतचा हक्क राखून ठेवत आहे.

कळावे,

29.12

(संजय जोरी)
**प्र. प्रशासकीय अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४
दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम - साईनिकेतन, मुंबई.
• Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in • Email : saibaba@sai.org.in